| | | |
|---|---|---|
| महाराष्ट्र पोलीस सद्रक्षणाय खलनिग्रहणाय | पोलीस उप आयुक्त वाहतुक विभाग, ठाणे शहर<br>तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)<br>दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६<br>Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव |

OW/DCP TRAFFIC/ADM/NOTIFICATION/ 28 /2022 DATE :- 30/03/2022

## –:वाहतुक नियंत्रण अधिसुचना:–

**संदर्भ :–** १) जा.क्र./सपोआ उल्हासनगर/१९७/२०२२ दि. २४/०३/२०२२

–––––oooo–––––

ज्याअर्थी, उल्हासनगर शहर तसेच वाहतुक उप विभाग, उल्हासनगर व विठठलवाडी (उल्हासनगर नं.१ ते ५) अंतर्गत दि. ०२/०४/२०२२ रोजी **"सिंधी बांधवांचा चेटीचंड उत्सव"** साजरा करण्यात येणार असुन सदर मिरवणुकीत मोठया प्रमाणात सिंधी बांधव सामील होत असल्याने त्यानिमित्त सदर मिरवणुकीच्या दरम्यान मिरवणुक मार्गावर वाहतुक कोंडी होवू नये याकरीता सदर मार्गावरील वाहतुक कोंडी टाळण्यासाठी, वाहतुक सुरळीत व सुनिश्चित व्हावी तसेच नागरीकांची गैरसोय होवू नये याकरीता, **आम जनतेच्या सोईसाठी.**

त्याअर्थी, मी बाळासाहेब पाटील, पोलीस उप आयुक्त, वाहतुक विभाग, ठाणे शहर म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे :–

**प्रवेश बंद व No Parking**

१) **उल्हासनगर वाहतुक उप विभागाचे हददीत–** झुलेलाल मंदिर चौक–साधुबेला चौक–भारत चौक–शिरु चौक–नेहरु चौक–लिंक रोड–न्युईरा चौक–शिवाजी चौक–शास्त्री चौक–हिराघाट–पवईचौक पर्यत या मिरवणुकीच्या मार्गावर सर्व प्रकारच्या वाहनांना, चेटीचंड महायात्रा मिरवणुक पवई चौकात जाई पर्यत दि. ०२/०४/२०२२ रोजी सकाळी ११.०० ते रात्री १८.०० वाजे पावेतो रस्त्याचे दोन्ही बाजुस **No Parking** व **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे.

**प्रवेश बंद व No Parking**

२) **विठठलवाडी वाहतुक उप विभागाचे हददीत–** श्रीराम चौक–ओटी सेक्शन चौक–मेनबाजार–व्हिनस चौक–नेताजी चौक–भाटीया चौक–३९ सेक्शन–गाउन बाजार–दुध नाका–मठ मंदिर चौक–या मिरवणुकीच्या मार्गावर सर्व प्रकारच्या वाहनांना, चेटीचंड महायात्रा मिरवणुक चालीया मंदिर चौकात जाई पर्यत दि. ०२/०४/२०२२ रोजी दुपारी १२.०० ते रात्री २२.०० वाजे पावेतो रस्त्याचे दोन्ही बाजुस **No Parking** व **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –**

१) **झुलेलाल मंदिर चौक–** झुलेलाल मंदिर मार्ग भारत चौक गोल मैदान तसेच बिर्लागेट व इतर ठिकाणी जाणारी सर्व प्रकारची वाहने ही झुलेलाल चौक येथुन खेमाणी मार्गे इच्छित स्थळी जातील.

२) **उल्हासनगर वाहतुक उप विभाग कार्यालय समोरील चौक–** येथुन भारत चौक मार्गे खेमाणी –धोबीघाट– तसयेच झुलेलाल चौक मार्गे जाणा–या सर्व प्रकारची वाहने उल्हासनगर वाहतुक उप विभाग कार्यालय येथुन ओटी नं.१ मार्गे बाबा बसंतराम दरबार–मच्छीमार्केट येथुन इच्छित स्थळी जातील.

३) **भारत चौक–** भारत चौक मार्गे गोल मैदान नेहरु चौक बाजुकडे जाणारी सर्व प्रकारची वाहने ही मच्छीमार्केट येथुन इच्छित स्थळी जातील.

४) **नेहरु चौक–** नेहरु चौक मार्गे गोल मैदान नेहरु चौक बाजुकडे जाणारी वाहतुक ही मच्छिमार्केट मार्गे तसेच बाबा बेफिक्री चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

५) **शिवाजी चौक–** शिवाजी चौकात –अंबरनाथ शहर बाजुकडुन कल्याण बाजुकडे जाणारी सर्व प्रकारची वाहने ही फॉलवर लाईन येथुन जवाहर हॉटेल–नेहरु चौक–गोल मैदान–मधुबन चौक–गुरुद्वारा चौक–शांतीनगर मार्गे इच्छित स्थळी जातील.

६) **शास्त्री चौक–** शास्त्री चौक येथुन हिराघाटकडे जाणारी वाहने ही स्मशानभुमी चौक येथुन काजल पेट्रोलपंप मार्गे इच्छित स्थळी जातील.

७) तसेच कल्याण अंबरनाथ रोडने अंबरनाथ दिशेने जाणारी सर्व प्रकारची वाहने होंडा शोरुम येथे डावीकडे वळुन डॉल्फीन क्लब –गुरुद्वारा चौक–मधुबन चौक–नेहरु चौक–जवाहर हॉटेल–फॉलवर लाईन मार्गे इच्छित स्थळी जातील.

पोलीस उप आयुक्त, आ.यु.आ. व सावरकर रोड, ठाणे
आवक क्रमांक : 290
दिनांक : 30/3/2022

(कृ.मा.पा.)

Scanned with CamScanner

8

८) श्री राम चौकाकडुन ओटी सेक्शनकडे जाणारी वाहने पेट्रोल पंपाचे बाजुने व्हि.टी.सी.रोड मार्गे इच्छित स्थळी जातील.

९) ओटी सेक्शन कडून मेन बाजार मार्केट कडे जाणारी वाहने ही उल्हास स्टेशन मार्गे इच्छित स्थळी जातील.

१०) नेताजी चौकाकडून व्हिनस चौकाकडे जाणारी वाहने लालचक्की चौक व माणेरेगांव रोड मार्गे इच्छित स्थळी जातील.

११) कैलास कॉलनीकडुन भाटीया चौक व नेताजी चौकाकडे येणारी वाहने ही संभाजी चौक व उल्हासनगर स्टेशन मार्गे इच्छित स्थळी जातील.

१२) दुधनाका कडून गाउन मार्केटकडे येणारी वाहने ही ओटी सेक्शन उल्हासनगर नं.५ मार्गे इच्छित स्थळी जातील.

**सदरची वाहतुक नियंत्रण अधिसुचना दि. ०२/०४/२०२२ रोजी सकाळी ११.०० ते २२.०० वा. पावेतो अंमलात राहिल.** सदरची अधिसुचना पोलीस वाहने, फायरब्रिगेड,रुग्णवाहीका तसेच इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागु राहणार नाही.

( बाळासाहेब पाटील )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

प्रति,
जिल्हा प्रसिध्दी अधिकारी,ठाणे
२/— सदरची अधिसुचनेस प्रसिध्दी देणेस विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सादर
मा.पोलीस आयुक्त,ठाणे शहर
मा.पोलीस सह आयुक्त,ठाणे शहर
मा.अपर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशिक विभाग,कल्याण.
मा.जिल्हाधिकारी,ठाणे.
मा.आयुक्त,उल्हासनगर महानगरपालिका.

प्रत कार्यवाहीसाठी :—
उप प्रादेशिक परिवहन अधिकारी ,कल्याण
विभाग नियंत्रक,महाराष्ट्र राज्य परिवहन, कल्याण/विठ्ठलवाडी
पोलीस उपायुक्त, परिमंडळ—४,उल्हासनगर व विशेष शाखा,ठाणे
प्रत :— पोलीस उपायुक्त, आर्थिक गुन्हे,ठाणे शहर
२/— सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.
प्रत :— समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष,ठाणे
२/— सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.
प्रत :— सपोआ उल्हासनगर वाहतूक उपविभाग./प्रभारी अधिकारी, उल्हासनगर,विठठलवाडी,अंबरनाथ वाहतूक शाखा.

Scanned with CamScanner